पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६६ दिनांक ०६/११/२०२४**

# अवैधरित्या अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्या आरोपींवर पालघर पोलीस दलाकडून कारवाई

आगामी सार्वत्रीक विधानसभा निवडणुक २०२४ चे अनुषंगाने दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून संपुर्ण महाराष्ट्रात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व स्थानिक गुन्हे शाखा पालघर यांना पालघर जिल्हयात चालणारे अवैध धंदे, विनापरवाना अग्नीशस्त्र बाळगणारे इसम यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

दिनांक ०५.११.२०२४ रोजी श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांना गुप्त बातमीदारामार्फत अंमली पदार्थाची वाहतुक होणार असलेबाबतची गोपणीय माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांनी त्यांचेकडील स्ट्रायकिंग फोर्सचे अंमलदार सहा.फौज/म्हसकर, पोअं/४२२ चंद्रकांत केंद्रे, पोना/७९१ गोरखनाथ वाघ, पोअं/९५३ गोरखनाथ चव्हाण, पोअं/२५७ अजय मोरे, यांच्यासह दुपारी १३.०० वाजेपासून बोईसर पोलीस ठाणे हद्दितील खैराफाटक कोस्टल चेक पोस्ट येथे नाकाबंदी लावून वाहने तपासत असताना एक संशयीत मारुती सुझुकी कंपनीची इको चारचाकी वाहन क्र.एम.एच.४८.बी.एच.१४३९ ही त्या ठिकाणी आली. सदरचे इको वाहनामध्ये दोन इसम ‘मेथ्याक्वालोन’ (Methaqualone) पांढरे रंगाचा उग्रवासाची पावडर अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी जवळ बाळगुन वाहनातुन प्रवास करत असताना मिळुन आले आहेत. त्यांची नावे १) संग्रामसिंह राजदेवसिंह राजपुत, वय ४२ वर्षे, रा.घर नं-९०६ जुनाठपाडा, संजान ता.जि.वलसाड, राज्य गुजरात २) नितेश महेश अग्रवाल, वय ३९ वर्षे, रा.नरहरीसदन, प्लॅट न १९,२५ एसव्ही रस्ता सिटीसेंटर, गोरेगाव पश्चिम, मुंबई अशी असून त्यांचेकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

१) ४,००,०००/- रुपये मेथ्याक्वालोन अंमली पदार्थाची पांढरे रंगाची उग्रवासाची पावडर एका डबल प्लॅस्टीक कॅरीबॅगमध्ये मिळून तिचे वजन ४० ग्रॅम असून प्रतिग्रॅम दहाहजार बाजार मुल्य असलेली.

२) १५,०००/ रुपये समसंग कंपनीचा काळेरंगाचा मोबाईल हॅण्डसेट जुना वा कि.अं.

३) २०,०००/-रियलमी कंपनीचा गोल्डन रंगाचा मोबाईल हॅण्डसेट जुना वा कि.अं.

४) ००.००/रुपये काचेचे चंचुपात्र नळी जुनी वा कि.अं.

५) ००.००/रुपये डिजीटल वजनकाटा कोव्हिओ कपंनीचा जुना वा कि.अं

६) ६,००,०००/रुपये मारुती सुझुकी कंपनीची इको चारचाकी वाहन एम एच ४८ बी एच १४३९ असा नंबर असून पांढरे रंगाची जुनी.

७) २०,०००/रुपये पॉकेट एक त्यामध्ये संग्रामसिंह राजपूत याचे आधारकार्ड पॅनकार्ड, एटीएम, घडयाळ, दोन मोबाईल हॅण्डसेट एक इनटेक्स कंपनीचा व इनफिनिक्स कंपनीचा छोटया प्लॅस्टीक कॅरीबॅग, रोख ५५०/रुपये, कापडीमास्क, गाडीच्या चाव्या.

८) १५००/रुपये एक मनगटी घडयाळ सिल्वर रंगाचे टॅगहयुअर कंपनीचे.

९) १०,०००/रुपये एक मोबाईल मोटोरोला कंपनीचा ऑलीव्ह ग्रीन रंगाचा.

१०) ३०,८४०/रुपये रोख रक्कम त्यामध्ये ५०० रुपये दराच्या २१ नोटा, २०० रुपये दराच्या

असा एकूण १०,९७,३४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

वरील दोनही आरोपींना अटक करून त्यांचेविरुध्द बोईसर पोलीस ठाणे येथे ।। ५०३/२०२४ गुंगीकारक औषधीद्रव्य व मनोव्यापारावर परीनाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (NDPS) कलम ८ (क), २१, २२, २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्यातील जप्त अंमली पदार्थ हा वरील नमुद आरोपीत यांनी पाहिजे आरोपी मोहम्मद सलमानअली रफाई, रा.वलसाड, गुजरात याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास हा पोउपनि/मुंडे, नेमणुक बोईसर पोलीस ठाणे हे करत आहेत.

सदरची कामगिरी ही श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग व स्ट्रायकिंग फोर्सचे अंमलदार सहा.फौज/म्हसकर, पोअं/४२२ चंद्रकांत केंद्रे, पोना/७९१ गोरखनाथ वाघ, पोअं/९५३ गोरखनाथ चव्हाण, पोअं/२५७ अजय मोरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.